# प्रेसनोट

६७ वा अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळावा हा दि. १२/०२/२०२४ ते दि. १६/०२/२०२४ रोजी लखनऊ, उत्तरप्रदेश येथे संपन्न झाला असुन त्यामध्ये संपुर्ण देशातुन एकुण २९ राज्याच्या संघानी सहभाग नोंदविला होता. महाराष्ट्र राज्य पोलीस दलाच्या वतीने ५१ पोलीस अधिकारी /अंमलदार, ७ श्वान सहभागी झाले होते. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्र राज्य पोलीस दलाच्या संघाने **७ पदकांची कमाई करुन अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये तृतीय क्रमांक पटकाविला आहे.** नमुद पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये तेलंगणा राज्य प्रथम क्रमांकावर व कर्नाटक राज्य द्वितीय क्रमांकावर आहे. तसेच संगणक जागृकता स्पर्धा- इव्हेंट-४ या स्पर्धा प्रकारामध्ये मा. पोलीस महासंचालक कार्यालयाकडील Maharashtra Police Information System या आय.टी.प्रोजेक्टला **DG NCRB's Running Trophy for Empowering with Information Technology** ही ट्रॉफी महाराष्ट्र राज्य पोलीस दलाने प्राप्त केली आहे. सदर बक्षीस वितरण सोहळा लखनऊ, उत्तरप्रदेश येथे मा.मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या शुभहस्ते पार पडला.

पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांचे व्यावसायिक नैपुण्य व कौशल्य वाढविण्यासाठी अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्याचे धर्तीवर सन २००२ पासून महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्याचे आयोजन केले जाते. सदर मेळाव्यामध्ये १) सायंटिफिक एड टु इन्वेस्टीगेशन ( विज्ञान शास्त्राची तपासास मदत ) २) घातपात विरोधी तपासणी स्पर्धा ३) संगणक स्पर्धा ४) पोलीस फोटोग्राफी ५) पोलीस व्हिडिओग्राफी ६) श्वान स्पर्धा अशाप्रकारे स्पर्धा घेवून त्यामधील पदक प्राप्त विजेत्या स्पर्धकांचे दि. ११/१२/२०२३ पासून ते दि. ०५/०२/२०२४ रोजी पर्यंत विशेष प्रशिक्षण व सराव शिबीर हे गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्फत महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, रामटेकडी पुणे येथे आयोजित करण्यात आले होते. प्रशिक्षणा दरम्यान घेण्यात आलेल्या निवड चाचणीच्या आधारे अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्या करिता महाराष्ट्र राज्य पोलीस दलाच्या संघाची निवड करण्यात आली. ६७ व्या पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये महाराष्ट्र राज्याच्या पोलीस संघाने खालीलप्रमाणे एकुण ३ सुवर्णपदक, १ रजत पदके व ३ कांस्यपदके असे एकुण ७ पदके मिळवुन विशेष कामगिरी केली आहे.

अ) सायंटिफिक एड टु इन्वेस्टीगेशन या स्पर्धेमधील स्पर्धा उप प्रकार -

१. Medico Legal Test यामध्ये महाराष्ट्र पोलीस दलातील स्पर्धक श्रीमती मयुरी पवार, पोलीस उप निरीक्षक, नेमणूक- दहशतवाद विरोधी पथक,पुणे यांना सुवर्णपदक प्राप्त झाले आहे.

२. Finger Print Test यामध्ये महाराष्ट्र पोलीस दलातील स्पर्धक श्रीमती मयुरी पवार, पोलीस उप निरीक्षक, नेमणूक- दहशतवाद विरोधी पथक,पुणे यांना सुवर्णपदक प्राप्त झाले आहे.

३. Police Portrait यामध्ये महाराष्ट्र पोलीस दलातील स्पर्धक श्री. रमेश चव्हाण , पो.हवा नेमणूक- रत्नागिरी यांना सुवर्णपदक प्राप्त झाले आहे.

४. Crime Photo scene/Police Photography यामध्ये महाराष्ट्र पोलीस दलातील स्पर्धक श्रीमती चैताली गपाट, पोलीस उप निरीक्षक, नेमणूक- पुणे शहर यांना कांस्यपदक प्राप्त झाले आहे.

५. Handling Lifting &Packing यामध्ये महाराष्ट्र पोलीस दलातील स्पर्धक श्रीमती चैताली गपाट, पोलीस उप निरीक्षक, नेमणूक- पुणे शहर यांना कांस्यपदक प्राप्त झाले आहे. तसेच सायंटिफिक एड टु इन्वेस्टीगेशन या स्पर्धेमध्ये हार्डलाईनर ट्रॉफी मिळवुन अधिकारी व अंमलदार यांनी मोलाची कामगिरी केली आहे.

ब) Anti sabotage check - या स्पर्धेमधील उप स्पर्धा प्रकार -

१. Vehicle Search -या स्पर्धेमध्ये श्री.विनोद गायकवाड, पो.शि.नेमणूक रा.रा.पो.बल गट क्रमांक-२,पुणे यांना रजतपदक प्राप्त झाले आहे.

२. Acess Control - यामध्ये स्वप्नील दरवडे ,पो.शि.नेमणूक फोर्स वन मुंबई, यांना कांस्यपदक प्राप्त झाले आहे.

क) संगणक जागृकता स्पर्धा इव्हेंट-४ -

यास्पर्धा प्रकारामध्ये मा. पोलीस महासंचालक कार्यालयाकडील Maharashtra Police Information System या आय.टी. प्रोजेक्टला DG NCRB's Running Trophy for Empowering with Information Technology ही ट्रॉफी महाराष्ट्र राज्य पोलीस दलाच्या संघास प्राप्त झाली असुन यामध्ये मा.पोलीस महासंचालक कार्यालयातील आय.टी सेलचे सहा.पो.उपनि (बि.सं) श्री नटराजेश्वर अंधळकर ,श्री प्रशांत हिरगळ, व प्रमोद गाडेकर यांनी प्रमुख सहभाग नोंदविला आहे.

महाराष्ट्र पोलीस संघाच्या भरघोस यशाबद्दल, मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई श्रीमती रश्मी शुक्ला , मा.अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि. महाराष्ट्र राज्य, पुणे, श्री.प्रशांत बुरडे यांनी अभिनंदन केले असुन, मा.विशेष पोलीस महानिरीक्षक (रागुअवें) डॉ.दिलीप पाटील-भुजबळ, व मा.पोलीस उप महानिरीक्षक (प्रशासन) श्री सारंग अव्हाड, यांनी विजेते व त्यांच्या प्रशिक्षकांचे कौतुक केले आहे. तसेच तात्कालीन पोलीस अधिक्षक, श्री पंकज देशमुख. पोलीस अधिक्षक, श्रीमती पल्लवी बर्गे. पोलीस अधिक्षक, श्रीमती मनिषा दुबुले.अपर पोलीस अधिक्षक प्रशांत अमृतकर .अपर पोलीस अधिक्षक , दिनेश कदम. यांनी स्पर्धकांच्या प्रशिक्षणाकडे विशेष लक्ष दिले. टिम मॅनेजर म्हणून पोलीस अधीक्षक, श्रीमती पल्लवी बर्गे (कायदा व संशोधन) व श्रीमती संगिता जाधव, पोलीस उप अधीक्षक (विशेष शाखा) तसेच सायंटीफीक एड टु इन्वेस्टीगेशनचे मार्गदर्शक पोलीस उप अधिक्षक अर्चना पाटील (पुणे पथक), पोनि/पी.आर.कानकाटे, पोनि/प्रताप कुंभार, एस.डी.माने, व ॲन्टी सबोटेज चेक मार्गदर्शक राखीव पोलीस निरीक्षक संतोष जाधव,श्री. गोविंद जाधव, पोलीस उप अधिक्षक,प्रशांत मांडके. सपोफौ,श्वान पथकाचे प्रदिप जाधव. पोलीस उप अधिक्षक,पो.हवा झाकिर शेख, पोलीस फोटोग्राफी व व्हिडीओग्राफी मार्गदर्शक सुरेश रंगदाळ फोटोग्राफर, पी.के.खंडाळे, फोटोग्राफर तसेच संगणक स्पर्धा मार्गदर्शक पोलीस निरीक्षक, प्रविण भोसले, पो.हवा.जावेद खान, सपोर्टिंग स्टाफ पोहवा मोहन माळी,पोशि स्वप्नाली कोलते यांनी विशेष परिश्रम घेतले आहे. तसेच महाराष्ट्र राज्य गुप्तवार्ता प्रबोधिनी व राज्य राखीव पोलीस बल गट २, रामटेकडी, पुणे येथील सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी मोलाचे सहकार्य केले आहे.

-राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.


67वीं ऑल इंडिया पुलिस ड्यूटी मीट
जांच एवं विवेचना के मानक का उच्चीकरण
(12-16 फरवरी, 2024)
महाराष्ट्र पोलीस


67 वीं ऑल इंडिया पुलिस ड्यूटी


उत्तर प्रदेश
LIVE
Pause (k)